# 'मेट्रो-३'चा बोगदा विमानतळापर्यंत पूर्ण

## मरोळमधून झाला कामाला प्रारंभ

मुंबई, ता. २४ : कुलाबा ते सिप्झ या 'मेट्रो-३' मार्गावर मरोळ येथून बोगदा खणणाऱ्या 'वैनगंगा-१' या मशीनने (टीबीएम) सोमवारी छत्रपती शिवाजी महाराज विमानतळाच्या टर्मिनल-२ पर्यंत बोगदा बनवून सव्वा किलोमीटरचा टप्पा पूर्ण केला.

'वैनगंगा- १'ने मरोळ येथील पाली मैदानातील विवरातून या वर्षी ८ जानेवारी रोजी बोगदा खणण्यास सुरुवात केली होती. त्यानंतर हे मशीन आज टी टू (विमानतळाचे टर्मिनल टू) स्थानकाजवळ खणलेल्या विवरातून बाहेर आले. या समारंभासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हजर होते. आता हे मशीन बाहेर जमिनीवर आणून त्याची डागडुजी करून पुढील टप्प्याच्या खणतीसाठी पाठवले जाईल. या मशीनने अत्यंत कठीण असा खडक फोडत २५९ दिवसांत हा टप्पा पूर्ण केला. त्याने दिवसाला सरासरी ४.६ मीटर एवढ्या गतीने बोगदा खणला. त्याची माती बाहेर पाठवून बोगद्याला आतून गोलाकार भरभक्कम स्लॅबचे अस्तर लावण्याचे कामही केले. वर्सोवा-घाटकोपर मेट्रो मार्ग, तसेच सहार उन्नत मार्गाच्या खालून 'वैनगंगा'ने हे खोदकाम केले.

वर्सोवा ते घाटकोपर मेट्रो मार्ग, स्वामी समर्थनगर ते विक्रोळी मेट्रो मार्ग, तसेच सीप्झ व एमआयडीसी या महत्त्वाच्या ठिकाणांना हा मेट्रो-३ मार्ग जोडणार आहे.

**“ तीन ते चार वर्षांत सरकार मेट्रोची २७० किलोमीटरची कामे पूर्ण करणार आहे. मेट्रो-३ मार्ग हा त्यातील महत्त्वाचा टप्पा आहे. मुंबईकरांच्या भविष्यातील सुखकर, वेगवान व सुरक्षित प्रवासाचा हा महत्त्वपूर्ण भाग आहे.**

**- देवेंद्र फडणवीस**, मुख्यमंत्री.